## महत्त्वाची सूचना

(दि. 27/08/2020)

दि. 05 मे 2020 ते 11 मे 2020 दरम्यान Internal Quality Assurance Cell ने महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांकरीता "Training Program for faculty on LMS" हा प्रशिक्षण वर्ग आयोजित केलेला होता, यामध्ये प्रत्येकाकडून Google Classroom तयार करुन घेतली होती व Google Classroom च्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षण कसे द्यावयाचे या बाबत आपणांस प्रशिक्षण दिलेले आहे.

या सूचनेद्वारे कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना कळविण्यात येते की ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांना आपल्या विषयाच्या Google Classroom मध्ये समाविष्ट करुन घ्यावे व सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया संपेपर्यंत अभ्यासक्रम, आपल्या विषयाच्या बेसिक ज्ञानासंदर्भातील माहिती, ई-बुक्स इत्यादी Google Classroom च्या माध्यमातून उपलब्ध करुन द्यावे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शंका निरसन करण्याकरिता Google Classroom/Whatsapp Group/Email च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या संपर्कात रहावे.

विद्यार्थ्यांना Google Classroom मध्ये समाविष्ट करुन घेण्याकरीता लागणारे ई-मेल आयडी / फोन नंबर प्रत्येक वर्गाच्या प्रवेश समिती कडून उपलब्ध करुन घ्यावेत. प्रवेश समिती प्रमुखांनी प्रवेशित विद्यार्थ्यांची खालील नमुन्यातील यादी वरीष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील प्रवेश समिती प्रमुखांनी प्रा. बी. बी. राजेशेख, कला शाखेतील प्रवेश समिती प्रमुखांनी प्रा. भरत उसारे तर कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रवेश समिती प्रमुखांनी प्रा. यु. जी. मिणियार यांचेकडे पाठवाव्यात व संबंधीत प्राध्यापकांनी या सर्व याद्या GASCA Official Whatsapp Group वर पाठवाव्यात म्हणजे सर्व याद्या प्राध्यापकांना उपलब्ध होतील.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नांव | वर्ग | विषय | विद्यार्थ्याचा ई-मेल | विद्यार्थ्याचा फोन नंबर |
|---|---|---|---|---|---|

त्याच प्रमाणे दि. 09 ऑगस्ट 2020, रोजीच्या सूचने नुसार आपल्या विषयाचे महाविद्यालयाच्या IQAC ने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार ई-कंटेंट तयार करुन

विभाग प्रमुखांकडे जमा करण्यासंदर्भात आपणांस सूचित केलेले आहेच. महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर विद्यापीठाच्या/शासनाच्या आदेशान्वये नियमित ऑनलाईन पध्दतीने आपण अभ्यासवर्ग सुरु करणार आहोत. सबब आपण तयार केलेले ई-कंटेंट दि. 31/08/2020 पर्यंत आपल्या विभाग प्रमुखांकडे जमा करावे व विभाग प्रमुखांनी याबाबतचा अहवाल दि. 02/09/2020 पर्यंत कार्यालयात सादर करावा.

Rolkulkarni

(डॉ. रोहिणी कुलकर्णी-पांढरे)

प्राचार्य

शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

महाराष्ट्र शासन
# शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद
( नॅक "अ" दर्जा )

ई-मेल आयडी : gasca1923@gmail.com फोन / फॅक्स नं. ०२४० - २३३१४७६ वेब साईट : www.gasca.ac.in

जा. क्र.आस्था-१/२०२०-२१ / 2024 दिनांक :- २५/०५/२०२१ 25.05.2021.

## सुचना

वाचा :-
१. दि.०५.०४.२०२१ व दि. १९.०४.२०२१ चा कार्यालयीन आदेश.
२. दि.१४.०४.२०२१ चे डॉ.बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांचे परिपत्रक.

वरिल संदर्भाधिन कार्यालयीन आदेश व डॉ.बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांचे परिपत्रकान्वये महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुखांना सुचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती व Online तासिकांचा अहवाल व्यक्ती निहाय,CHB शिक्षकांसह दि. ०२.०६.२०२१ पर्यंत महाविद्यालयाच्याई-मेलवर पाठवावा.

सदर अहवाल दि. ०५.०४.२०२१ पासून ते दि. ३१.०५.२०२१ पर्यंतचा द्यावा.

25.5.2021.

**डॉ.आर.एच.सातपुते**
**प्र.प्राचार्य**
**शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय**
**औरंगाबाद.**

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
(नॅक समितीतर्फे "अ" दर्जा प्राप्त)
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

फोन नं. 0240-2331476 gasca1923@gmail.com फॅक्सनं. 0240 - 2331476

दिनांक :- १९/०४/२०२१

# सूचना

## II,IV and VI Sem तासिका बाबत

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांचे दिनांक १४/०४/२०२१ च्या परिपत्रकानुसार दिनांक ०५/०४/२०२१ पासून शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ च्या दुसऱ्या सत्राची सुरूवात झाली आहे. सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अनेक निर्बंध आहेत.

विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार द्वितीय सत्राच्या अभ्यासक्रमांची Online Classes सुरू करण्याचे निर्देश आहेत.

तरी या सूचनेद्वारे महाविद्यालयातील सर्व विषयांच्या विभाग प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी आपापल्या विषयाच्या द्वितीय सत्राच्या Online तासिका नियमित होतील याची दक्षता घ्यावी.

तसेच तासिकांच्या नोंदी, घेतलेल्या अभ्यासक्रमांची नोंदी पण विभागातील नोंदवही मध्ये ठेवाव्यात, आवश्यकता भासल्यास कार्यालयात सादर कराव्यात.

19.04.2021

(डॉ.आर.एच.सातपुते)
प्राचार्य
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद.

...NA & OTHER LETTERS & CERTIFICATES 2020-

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

# शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

( नॅक "अ" दर्जा )

ई-मेल आयडी : gasca१९२३@gmail.com फोन / फॅक्स नं. ०२४० - २३३१४७६ वेब साईट : www.gasca.ac.in

जा. क्र. आस्था-१/२०२०-२१ / 3254

दिनांक :- १०.११.२०२१

## सुचना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या Acadmic Calender-२०२१-२२ नूसार व दि. २७.१०.२०२१ च्या महाराष्ट्र शासनाच्या शालेय व क्रिडा विभागाच्या परिपत्रकानूसार, दि. ०१.११.२०२१ ते १०.११.२०२१ या कालावधी मध्ये वरिष्ठ महाविद्यालय व दि.२८.१०.२०२१ ते १०.११.२०२१ या कालावधीत मध्ये कनिष्ठ महाविद्यालयास दिवाळी निमित्य शैक्षणिक सुट्या होत्या.

उद्या दि. ११.११.२०२१ पासून वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय नियमित पणे सुरु राहातील. पुर्वी प्रमाणेच शिकविण्याच्या Online व Offline दोन्ही पध्दती पुढील आदेश येई पर्यंत सुरु राहातील

10.11.2021

डॉ. आर.एच.सातपुते
प्र.प्राचार्य
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद

D:\Other Files 01.02.2017\DHE LETAR.doc 266

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

# शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

( नॅक "अ" दर्जा )

ई-मेल आयडी : gasca१९२३@gmail.com फोन / फॅक्स नं. ०२४० - २३३१४७६ वेब साईट : www.gasca.ac.in

जा. क्र.आस्था-१/२०२०-२१ / 1200 दिनांक :- २२/०९/२०२०

## सूचना

महाविद्यालयातील सर्व वरिष्ठ / कनिष्ठ अधिव्याख्यात्यांना कळविण्यात येते की, शिक्षण संचालक उच्च / शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्र क्रमांक : युएनआय /२०२० /बैठक/विशि-१/६०४४ दि. १८.०९.२०२० अन्वये कळविण्यात आले की, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन वर्ग सूरु करणे व विद्यार्थ्यांच्या १००% उपस्थितीबाबत आपल्या विषयाच्या विद्यार्थ्यांच्या शिकवणी बाबत काय उपाययोजना करत आहात या बाबतचा अहवाल मागविण्यात आला आहे.

तरी सोबत संचालनालयाच्या पत्राची प्रत सुलभ अकलनासाठी देण्यात येत आहे तरी सदरचा अहवाल दि. २४.०९.२०२० पर्यंत कार्यालयाच्या आवक / जावक शाखेत जमा करावे. (सोबत संचालनाल्याचे पत्र)

Rakulkarni

डॉ. रोहिणी कुलकर्णी - पांढरे

प्र.प्राचार्य

शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय

औरंगाबाद.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१**

www.dhepune.gov.in Email- vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स ०२०/२६१११९५३

क्रमांक- युएनआय/२०२०/बैठक/विशि-१/6044 दिनांक- सप्टेंबर

18 SEP 2020

प्रति,

१.कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२. प्राचार्य / संचालक,
सर्व शासकीय महाविद्यालये संस्था,महाराष्ट्र राज्य.

विषय- राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालय / संस्थेमध्ये ऑनलाईन वर्ग सुरू झाल्याबाबत व विद्यार्थ्यांची उपस्थितीबाबत..

संदर्भ-१.संचालनालयाचे समक्रमांक दि.२१ ऑगस्ट २०२० रोजीचे पत्र.
२.संचालनालयाचे समक्रमांक दि.२४ ऑगस्ट २०२० रोजीचे पत्र.
३. शासनाचे क्र.संकीर्ण-२०२० / प्र.क्र.१७७ / विशि-३ दि.१७ सप्टेंबर २०२० रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबतची संचालनालयाची संदर्भांकित पत्रे व शासनाचे दि.१७ सप्टेंबर २०२० रोजीचे संदर्भीय पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.(सोबत प्रत जोडली आहे)

राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्लित महाविद्यालये व शासकीय महाविद्यालये / संस्थेमध्ये ऑनलाईन वर्ग सुरू झालेल्या अभ्यासक्रमाची, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबतची तसेच शैक्षणिक वेळापत्रकाबाबतची आपल्याकडून प्राप्त माहिती संचालनालयाच्या संदर्भांकित पत्र क्र.०२ नुसार शासनास सादर करण्यात आलेली होती. त्यास अनुसरून शासनाने संदर्भांकित पत्र क्र.०३ नुसार जेथे कमतरता आहे त्यांचाकडून सविस्तर अहवाल मागविण्याचे निर्देश दिलेले आहेत.

संदर्भांकित शासन पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, राज्यातील काही विद्यापीठामध्ये तसेच शासकीय महाविद्यालयांमध्ये काही ठिकाणी १० ते १५% तर काही ठिकाणी ६० ते ७०% विद्यार्थ्यांची उपस्थिती दिसून येते. तरी १००% विद्यार्थी उपस्थित राहण्याच्या दृष्टीकोनातून तसेच इतर कमतरता दूर करणेसंदर्भात आपल्या स्तरावरून कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत वा करण्यात येत आहेत याबाबतचा सविस्तर अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- माहितीस्तव सादर-
१.मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

आवक क्र. 939
दिनांक 19/09/2020
शासकीय ज्ञान ... महाविद्यालय
औरंगाबाद

महाराष्ट्र शासन

क्रमांक-संकिर्ण-२०२०/प्र. क्र.१७७/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक १७ सप्टेंबर, २०२०

प्रति,

संचालक,
उच्च शिक्षण,
पुणे.

विषयः- राज्यातल अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालय/संस्थेमध्ये ऑनलाईन वर्ग सुरू झाल्याबाबत व विद्यार्थ्यांची उपस्थितीबाबत.

संदर्भः- आपले पत्र क्र.युएनआय/२०२०/बैठक/विशि-१/५४८५ दि. २४/०८/२०२०.

महोदय,

राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयामध्ये व शासकीय महाविद्यालये/संस्थेमध्ये ऑनलाईन वर्ग सुरू झालेल्या अभ्यासक्रमाची, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबतची तसेच शैक्षणिक वेळापत्रकाची माहिती पाठविणेबाबतचा अहवाल आपण उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर पत्रावर अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी जेथे कमतरता आहे त्यांच्याकडून सविस्तर अहवाल मागविण्याचे असे निर्देश दिले आहेत.

तरी, अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल तात्काळ शासनास सादर करावा.

आपला,

(प्रविणकुमार पवार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन